• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३३४ • बुधवार,दि. ६ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 334 • Wednesday 6 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

## गद्दार गेल्यामुळे ठाकरेंची ताकद वाढली –ठाकरे



मुंबई – आदित्य ठाकरे म्हणाले की, फुटलं कोण आहे? आमच्यातून सामान्य शिवसैनिक नाही. सामान्य नागरिक उलट आमच्याजवळ आला. सामान्य शिवसैनिक आमच्या जवळ आला. पारंपारिक मतदार जो नव्हता त्यांनी उद्धवसाहेबांचं सरकार बघितलं, आमचं काम बघितलं, दोघांचं काम असेल, आमच्या सगळ्या पूर्ण सरकारचं काम बघितलं. मी असतो किंवा नसतो, त्यापेक्षा प्रत्येकाची मी स्टोरी सांगितल्यास तुम्हाला ४० नेटफ्लिक्स एपिसोड करायला लागतील आणि तुम्ही हसायला लागाल. ते पुढे म्हणाले की, मूळ गोष्ट अशी की ज्या व्यक्तींनी स्वतःला विकलं. उद्धवसाहेबांच्या दोन शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्या काळात जे उद्धवसाहेबांच्या मागे असं काही करू शकतात? दरम्यान, पुढील पानावर

## अपहार करून कंपनीची फसवणूक

बीड – महिला गटाकडुन कर्जापोटीच्या हफ्त्याची रक्कम वसुल करून ती रक्कम शाखा प्रमुखाकडे जमा न करता किंवा कंपनीचे बँक खातेवर जमा न करता आरोपीने ९० हजार २६२ रुपयाचा अपहार करून कंपनीची फसवणुक केली म्हणुन शहर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.रीयाज महेबुब शेख रा. बाराहाळी ता. मुखेड जि. नांदेड असे आरोपीचे नाव आहे. ही घटना दि.६ ऑक्टोबर २०२३ रोजी अंबाजोगाई येथे घडली असून याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दि.५ मार्च २०२४ रोजी शाखा अधिकारी संतोष ओकांर डोणे यांच्या फिर्यादीवरून आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनात कळविण्यात येते की, दत्तात्रय सखाराम नरनाळे, ज्योती दत्तात्रय नरनाळे यांनी दिलेल्या माहितीवरून ज्यांनी बीड मोहल्ला, सदाशिवनगर, नवीन वाढीव नगर परिषद हद्दीच्या आतील सर्वे नं. ७८ तरफ बलगुजार मधील निल जिवन रेसीडेन्सी –२ मधील रो–हाऊस क्र. 5 (2BHK) हे त्यांची लिहून देणार नामे – क्र. १) नितीन रतिपालसिह राजपूत, रा. बुंदेलपुरा, २) राजलक्ष्मी बिल्डर्स, डेव्हलपर्स ॲण्ड कन्स्ट्रक्शन (विकासक) प्रो.प्रा. अमित बाबुराव शिराळे यांच्याकडून दि. ०७/०४/२०२४ रोजी यांनी इसार पावती क्र. दस्तक्रमांक ६८५/२०२४ नुसार इसारपावती आधारे साक्षीदारा समक्ष खरेदी केले आहे. ज्याची लांबी पुर्व–पश्चिम १३ मिटर व रूंदी दक्षिण–उत्तर ८.८१ मीटर आहे. याचे एकूण क्षेत्रफळ ४९.५ चौ.मी. आहे. ज्यामध्ये २९.६८ चौरस मीटर क्षेत्रफळाचे तळमजला बिल्टअपचे बांधकाम आहे. २९.६८ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम असून सहन जागा आहे. तसेच निल जिवन रेसीडेन्सी–II प्लॉट क्र. ३० पैकी ३१ पुर्ण व प्लॉट क्र. ३२ पुर्णची एकत्रीत चर्तुसिमा – पुर्वेस – या लेआऊटमधील प्लॉट क्र. ४१,४२ व ४३, पश्चिमेस – या लेआऊटमधली १ मीटर रूंदीचा रस्ता, दक्षिणेस – या लेआऊट क्र. ३३ प्लॉट, उत्तरेस – या लेआऊटमधील प्लॉट क्र. ३० पैकी तसेच रोहाऊस क्र. 5 (2 BHK) चर्तुसिमेप्रमाणे. पुर्वेस याच लेआऊटमधील प्लॉट क्रमांक ४१,४२ व ४३, पश्चिमेस – या लेआऊटमधील ९ मी. रूंदीचा रस्ता, दक्षिणेस – रोहाऊस क्रमांक ४, उत्तरेस – या लेआऊटमधील प्लॉट क्र. ३० पैकी येणे प्रमाणे चर्तुसिमेअंतर्गत येणारा रोहाऊस क्र. 5 (BHK) मधील आरसीसी बांधकाम विज फिटींग, नळ फिटींग, दगड माती, तदंगभुत वस्तुसह आमचे पक्षकार यांनी खरेदी केलेला आहे. सदरील रोहाऊस हे निर्विवाद असून कर्ज विरहीत आहे. सदरील रोहाऊस आरक्षण विरहित आहे. तसेच सदरील रोहाऊस वरती शासकीय, निमशासकीय अथवा खाजगी, कर्जबोजा नाही, निघाल्यास रोहाऊस विक्री करणाऱ्या सर्व लिहून देणार यांची जबाबदारी राहिल. सदरील रोहाऊस हे त्यांच्या आमच्या पक्षकाराशिवाय कोणाचेही दान, गहाण, तारण, बक्षीस, विक्री, भाडेपत्र, इसारपावती, मुख्त्यारपत्र या मार्गाने व इतर अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत केलेले नाही तसा लेखी व तोंडी करार केलेला नाही. तसे आढळून आल्यास याची सर्व जबाबदारी लिहून देणार क्र. १ व २ यांच्यावर राहिल. तरी सदर प्रगटनाचा कोणास आक्षेप असल्यास त्यांनी लेखी / अथवा तोंडी १५ दिवसाच्या आत कळवावा. अन्यथा त्याची सर्व जबाबदारी आमच्या पक्षकारावर राहणार नाही. सबब हे जाहिर प्रगटन.

कोर्टाचा शिक्का

मार्फत
ॲड. शेळके वाय.आर.
९५२७२१२१११

प्रगटन देणार
१) दत्तात्रय सखाराम नरनाळे
२) ज्योती दत्तात्रय नरनाळे
मो. नं. ९८२२१५२९५५

# विडा प्राथमिक आरोग्य केंद्राला मिळाला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा –आ.नमिता मुंदडा

केज । प्रतिनिधी

**तालुक्यातील विडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा मिळवून देण्याचा शब्द आमदार नमिता मुंदडा यांनी दिला होता. या शब्दाला अनुसरून आ. मुंदडा यांनी आग्रहाने पाठपुरावा केल्यानंतर राज्य शासनाने विडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाने विडा आणि आजूबाजूच्या ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळणे शक्य होणार आहे.**



विडा ही केज तालुक्यातील महत्वाची बाजारपेठ आहे. आजूबाजूची २५ पेक्षाही अधिक खेडी या बाजारपेठेवर अवलंबून असल्याने येथे वर्दळ असते. साहजिकच येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातही दररोज २५० ते ३०० रुग्ण उपचारासाठी येत असतात. वाढत्या लोकसंख्येच्या मानाने हे प्राथमिक आरोग्य केंद्र सुविधा पुरविण्यास असार्थ ठरू लागले होते. आजारी व अपघातग्रस्त व्यक्तींना बीडच्या शासकीय रुग्णालयात घेऊन जावे लागते. हे अंतर दूरवर असल्यामुळे अनेक रुग्णांनी वेळेत उपचार न मिळाल्याने प्राण गमावलेले आहेत. त्यामुळे या भागासाठी ग्रामीण रुग्णालयाची नितांत आवश्यकता होती. हि बाब लक्षात घेत आ. नमिता मुंदडा यांनी मागील चार वर्षापासून विडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी राज्य शासनाकडे करून त्यासाठी पाठपुरावा सुरु ठेवला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून राज्य शासनाने विडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जावाढ करण्याचा निर्णय घेतला असून लवकरच या ठिकाणी आता तीस खाटांचे ग्रामीण रुग्णालय होणार आहे. त्यामुळे विडा आणि आजूबाजूच्या ग्रामीण भागाला चांगली आरोग्यसेवा मिळणे शक्य होणार आहे. याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्यमंत्री तानाजी सावंत, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे, बीडच्या खासदार प्रीतमताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत. विडा प्रा.आरोग्य केंद्राला ग्रामीण रूग्णालयाचा दर्जा मिळावा यासाठी खा.डॉ.प्रितमताई मुंडे व आ.नमिताताई मुंदडा यांच्या माध्यमातून सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला होता.अखेर पाठपुराव्याला यश मिळाले आसून विडा प्रा.आरोग्य केंद्राला ग्रामीण रूग्णालयाचा दर्जा प्राप्त झाला आसून जनतेला दिलेला शब्द पुर्ण केला आहे. आडस, विडा पाठोपाठ बनसारोळा प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करण्यासाठी देखील प्रयत्न सुरू आहेत. सदरील प्रस्तावात काही त्रुटी आहेत. या त्रुटी दूर होताच बनसारोळाला देखील ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा मिळणे सुकर होईल.



# नवीन टेंडर नसताना टँकरचे भाव वाढविण्याची तयारी –ॲड. देशमुख

बीड । प्रतिनिधी



बीड जिल्ह्यात पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी कंत्राटदाराची निविदा प्रक्रिया अजून पूर्ण झालेली नाही. त्यामुळे जुन्या कंत्राटदाराला मुदत वाढ देण्यात आली आहे. मात्र असे असताना गेवराई तालुक्याच्या पंचायत समितीने सत्तावन गावामध्ये पाण्याचे टँकर हवे असल्याचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केला आहे. जुन्या कंत्राटदाराचा दर अत्यंत कमी आहे. नवीन दर वाढवले जात आहेत. आणि शासन दराने काम दिले जात आहे. असे झाले तर शासनाचे करोड रुपयांचे नुकसान होईल आणि त्याची किंमत जिल्हा प्रशासनाला मोजावी लागेल, असा इशारा ज्येष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रनित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित देशमुख यांनी दिला आहे.

पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरसाठी शासनाचा दर हा दोनशे सत्तर रुपये प्रति टन आणि डिझेल दर तीन रुपये चाळीस पैसे प्रति किलो मीटर असा आहे. तर जुन्या कंत्राटदाराने भरलेला दर हा फक्त पंच्याअंशी रुपये प्रति टन आणि तीन रुपये तीस पैसे प्रति टन प्रति किलोमीटर असा आहे. त्यामुळे अशा पद्धतीने कंत्राटाचे निविदा पूर्व वाटप झाल्यास शासनाला करोडो भुर्दंड पडणार आहे. आणि कोट्यवधी रुपयांची लूट होणार आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने असा प्रकार करू नये. अन्यथा आम्हाला उच्च न्यायालयात पुढील पानावर

## शिक्षण क्षेत्रात संस्कृती विद्यालयाचे योगदान –राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी



संस्कृती विद्यालय हे ग्रामीण भागातील ऊसतोड कामगार शेतकरी कुटुंबातील मुलांना दर्जेदार व उच्च शिक्षण देणारे विद्यालय आहे. शिस्तप्रियपणा व सुसंस्कृत वातावरण या शाळेत पाहायला मिळाले. विद्यार्थी आहे तसा स्वीकारून पाहिजे तसा घडवणे असे ब्रीद घेऊन ही संस्था कार्यरत आहे. पुढील पानावर

## जिल्हा परिषदेतील ५०० विद्यार्थ्यांना मिळणार नवी दृष्टी

बीड । प्रतिनिधी



राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातंर्गत जिल्हा परिषदेतील ५०० विद्यार्थ्यांना मिळणार नवी दृष्टी रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सहकार्याने मोफत चष्माच्या रूपाने मिळणार असल्याने जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी चॅरिटेबल ट्रस्टचे आभार माननु ज्या विद्यार्थ्यांना चष्मा लागेला आहे त्यांनी तो नियमीतपणे वापरण्याचे आवाहन यावेळी केले. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातंर्गत बीड जिल्हयातील पुढील पानावर

## गटविकास अधिकारी समृद्धी दिवाणेंकडून समृद्धी घडवणे अशक्य

केज । अशोक भोसले



केज पंचायत समितीत नूकत्याच रूजू झालेल्या समृद्धी दिवाणेंकडून पहिल्याच दिवशी विविध कामानिमित्ताने आलेल्या प्रतिष्ठीतांना हामरे तुमरीची भाषा वापरणार्या समृद्धी दिवाणे तालुक्याची समृद्धी कसी करणार असाच प्रश्न उपस्थित केला जात आहे. केज पंचायत समितीतीच्या गटविकास अधिकार्यांचा पदभार समृद्धी दिवाणे यांनी नूकताच स्विकारला आसून चार दिवसानंतर त्यांनी आज पहिल्यांदाच आपल्या कार्यालयात उपस्थित होत्या. यावेळी तालुक्यातील काही सरपंच, उपसरपंच, रोजगारसेवक व नागरीकांची विविध कामासाठी उपस्थिती होती.दरम्यान गटविकास अधिकारी समृद्धी दिवाणे यांनी पंचायत समिती येथे आ.नमिताताई मुंदडा पुढील पानावर

# आ.सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने ज्ञानदानासाठी ४० लक्ष रुपये मंजूर


आष्टी । प्रतिनिधी



माजी राज्यमंत्री आमदार सुरेश धस यांनी जिल्हा नियोजनतून जिल्हा परिषद शाळेसाठी ४० लक्ष मंजूर झाल्याची माहिती सरपंच संदिप खाकाळ यांनी दिली. तालुक्यातील शेरी बु येथील जि.प. शाळाची अतिशय दयनीय अवस्था झालेली असून ती कधीही ढासळून मोठी दुर्घटना घडू शकते. अशा परिस्थितीत शिक्षण विभाग बघ्याची भूमिका घेत असून तात्काळ शाळा खोल्या मंजूर करण्याची वारंवार मागणी युवानेते सरपंच संदीप खाकाळ यांनी केली होती दगडी बांधकाम ३५ वर्षांपूर्वी झाले असून ९० आसपास विद्यार्थी जीव मुठीत धरून ज्ञानार्जन करीत असून या शाळेत लोकसहभागातून इ लर्निंगची सोय करण्यात आली आहे. चार वर्गखोल्या असून दगडी भिंतीला मोटमोठे तडे गेले असून अनेक वर्गखोल्या या गळक्या असून दगडी भिंती अत्यंत धोकादायक झाल्या आहेत. त्यामुळे शाळा धोकादायक झाली असून येथे विद्यार्थी बसवु नयेत असा अहवाल देखील अभियंत्याने दिला असून अशा परिस्थितीमध्ये चिमुकले जीव मुठीत धरून शिक्षणाचे धडे गिरवीत आहेत. पावसाळ्यात ही शाळा कोणत्याही क्षणी कोसळून दुर्घटना घडू शकते म्हणून शिक्षण विभागाने तात्काळ शाळा खोल्या मंजूर कराव्यात म्हणून गटशिक्षणाधिकारी कार्यालयात शाळा भरविण्यात आली परंतु या बाबतीत युवानेते यांनी वारंवार माजी राज्यमंत्री आ.सुरेश धस यांनी चार नवीन वर्गखोल्या साठी ४० लक्ष रुपये मंजूर झाले असून पालकांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून आ धस यांचे आभार व्यक्त करीत आहेत. लवकरच या नवीन शाळा खोल्याचे अतिशय उत्कृष्ट दर्जाचे काम करण्यात येईल अशी माहिती युवानेते सरपंच संदीप खाकाळ यांनी दिली.

## संपादकीय

# मॉल संस्कृती आणि ग्राहक



भारतात आकारास आलेल्या मॉलनी ग्राहकांच्या जीवनशैलीत कायापालट केला असून, ही बाब खरी आहे. त्याचवेळी किरकोळ बाजारातील व्यावसायिक एकवटण्यास आणि अधिक संघटित होण्यास मदत मिळाली आहे. मॉलमुळे भारतीय ग्राहकांची जीवनशैली पूर्णपणे बदलून गेली आहे. लोकसंख्येतील वाढ, अपेक्षांमधील बदल आणि तंत्रज्ञानातील विकासाचा वस्तू आणि सेवांच्या विक्रीवर आणि विक्रीच्या शैलीवर परिणाम झाल्याचे दिसून येते. या संक्रमणात ग्राहकांविषयी व्यक्त होणारा भावनिक ओलावा क्रमशः कमी-कमी झाल्याचे दिसून येत असले, तरी सेवा-सुविधांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे, हे मान्य करावे लागेल. पूर्वीच्या काळी गल्लीतल्या किराणा दुकानदाराला सर्व ग्राहकांची नावे तोंडपाठ असायची. एवढेच नव्हे, तर प्रत्येक ग्राहकाचा नोकरीधंदा काय आहे, त्याच्या घरात किती माणसे आहेत, मुले काय शिकतात, हेही त्याला ठाऊक असायचे. दुकानात गेले की, घरगुती भाषेत ग्राहकाचे स्वागत होत असे. वर्तमानपत्राच्या त्रिकोणी घडीत डाळ, साखर घेऊन पुड्याच्या दोर्याने बांधता-बांधता घरातल्या वयोवृद्ध, आजारी व्यक्तींच्या तब्येतीची विचारपूस दुकानदाराकडून आस्थेने केली जायची. मुलांना किती मार्क पडले, हेही तो विचारायचा. नोकरदारांना महिन्यातून एकदाच उत्पन्न मिळते; मात्र दुकानाची पायरी त्याला जवळजवळ रोज चढावी लागते, हे माहीत असल्यामुळे नियमित ग्राहकांची 'खाती' दुकानदाराकडे असायची. मालाची यादी घेऊन लहान मुलांना दुकानात पाठवले जायचे. दुकानदार त्याच्याकडच्या पिशव्या काऊंटरवरून आत घेऊन माल बांधून होईपर्यंत लहान मुलांना चॉकलेट-गोळ्या द्यायचा. रावळगावचं कडक चॉकलेट, पारलेचे मऊ चॉकलेट, लिमलेटच्या गोळ्या आणि पेपरमिंट एवढीच 'व्हरायटी' उपलब्ध असायची. तेथून ते मॉल संस्कृतीपर्यंतचा प्रवास पूर्ण करण्यासाठी आपला बराच काळ गेला आहे. एकेकाळी वेगवेगळ्या सामानासाठी वेगवेगळ्या दुकानांवर जावे लागत असे. हळूहळू सुपर बाजार मॉलमध्ये परावर्तित झाला. मॉल संस्कृती ही वास्तविक लोकांची मानसिकता लक्षात घेऊन अस्तित्वात आणली आहे. मॉल हे पूर्णपणे ग्राहकांना आकर्षित करण्याचे केंद्र बनले असून, त्यानुसारच रचना केली आहे. मॉलबाहेरच खाण्यापिण्याचे स्वादिष्ट पदार्थ, चटपटीत, मसालेदार खाद्यपदार्थ ग्राहकांना अधिक आकर्षित करणारे असतात. मॉल संस्कृती नावानुसार प्रत्येक लहान गोष्टीला व्यापक रूपातून आणि आकर्षक पद्धतीने सादर करत असते. एवढेच नाही, तर मॉलचे नावही मोठे आणि उठावदार दिसेल या पद्धतीने लावण्यात येते. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीच्या नजरेत मॉलचे नाव कोठूनही दिसते आणि ते नजरेत भरते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट आणि त्याकडे सहजासहजी कोणाचे लक्ष जात नाही आणि ती म्हणजे मॉलला जाण्यासाठी वेळेचे बंधन नसणे. कोणत्याही मॉलमध्ये घड्याळ नसते, यामागचा उद्देश ग्राहकांना वेळेच्या बंधनापासून दूर नेणे, जेणेकरून आपण मॉलमध्ये पाऊल टाकू तेव्हा आपल्याला वेळेचे भान राहणार नाही. जोपर्यंत आपला खिसा रिकामा होत नाही, तोपर्यंत शॉपिंग करण्याची मानसिकता तयार करण्याचे काम मॉलच्या वातावरणाकडून केले जाते. मॉल संस्कृतीने भारतीय खरेदीच्या पद्धतीने क्रांतिकारी बदल घडवून आणला आहे, असे आपण म्हणू शकतो. एखाद्या दुकानात उन्हाच्या तीव्र झळा सहन करत खरेदी करण्याऐवजी वातानुकूलित मॉलमध्ये खरेदीचा आनंद लुटला जात आहे. मॉलमध्ये खरेदी केल्याने ग्राहकांना चांगले, गुणवत्तापूर्ण, ब्रँडेड उत्पादन खरेदी करण्याची इच्छा पूर्ण होते आणि त्यामुळे समाधान लाभते. शॉपिंग मॉलनी भारतात नवीन संस्कृतीला जन्म दिला आहे. ही संस्कृती पारंपरिक खरेदी संस्कृतीपेक्षा वेगळी आहे. भारतात उत्पन्न वाढल्याने बाजारपेठ क्षेत्रात लोकांना काम करण्याची संधी नव्याने उपलब्ध होत आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबांच्या जीवनशैलीत सुधारणा आणि बदल झालेला आहे. मॉलमुळे भारतीय ग्राहकांची जीवनशैली पूर्णपणे बदलून गेली आहे. किरकोळ बाजार संघटित होण्यास मदत मिळत आहे.

पान १ वरून

## गद्दार गेल्यामुळे ठाकरेंची

हे सर्व तुमच्यासोबत होते मग आताच आरोप कशासाठी? अशी विचारणा केल्यानंतर ते म्हणाले की, आमच्या मंत्रिमंडळात अशी व्यक्ती होती की त्यांच्यावर घाणेरडे आरोप झाले. त्यांना आम्ही गेट आउट सांगितलं आणि मंत्रिमंडळातून बाहेर काढलं होतं. तेवढी हिम्मत दाखवत तुम्ही मंत्रीमंडळातून किंवा आमदारकीतून बाजूला करायला पाहिजे होतं. तुम्ही पुढील वेळी तिकीट नका देऊ. जर कोणी कारवाई करत असेल तर अडवू नका. आज काय झालं आहे कोणावर आरोप होतो तो तीन दिवसात ती व्यक्ती तिथे जाते. दुसऱ्या व्यक्तीवर आरोप होतो पाचव्या दिवशी ती व्यक्ती तिथे जाते. गद्दारांना आम्ही घेणार नाही, असेही त्यांनी सांगितले. राजकारणात कोणी कोणाशी युती करायची, पक्ष न फोडता हा प्रत्येक पक्षाचा त्यांचा अधिकार असतो आता. २००७ मध्ये जेव्हा बाळासाहेब ठाकरेंनी प्रतिभाताईंना पाठिंबा तसेच प्रणवदांना आम्ही जाहीरपणे पाठिंबा दिला होता. २०१२ ला माझे आजोबांना भेटून गेले होते. काँग्रेस काही देशाच्या विरोध पक्ष नाही. पीडीपी बरोबर सोबत भाजप बसले तेव्हा कोणी काही बोललं नाही. म्हणून मी सांगतोय की चौथा जो होतो तो एवढ्यासाठीच होतो. आमचे वायकर साहेब आहेत त्यांना हैराण केलं आहे. या आमच्या पक्षात, रिकन्सिडर करतो, असे म्हणत असल्याचे म्हणत आहेत.

## नवीन टेंडर नसताना

धाव घ्यावी लागेल, असा इशारा देशमुख यांनी दिला आहे. टँकर घोटाळ्या मध्ये यापूर्वी आम्ही राज्यस्तरावर दोन-तीन वेळेस बदल घडवून आणले आहेत. तसेच काही कंत्राटदारांवर गुन्हे दाखल करायला लावले. तर काही कंत्राटदारांना आमच्यामुळे लाखो रुपये दंड भरावा लागलेला आहे. त्यामुळे या घोटाळ्याचा आपल्याला चांगला अभ्यास असून प्रशासनाने गडबड केली तर प्रशासनाला जाब विचारला जाईल. काही होत नाही, अशा भ्रमात प्रशासनाने राहू नये, असेही देशमुख यांनी म्हटले आहे. निविदा प्रक्रिया चालू आहे. या संदर्भातील प्रकरण मा. उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे अशा पद्धतीने मार्ग काढत असताना जुने दर पाहणे आणि जुन्या कंत्राटदराला दिलेली मुदत वाढ पाहणे गरजेचे आहे. त्या कंत्राटदाराला नवीन निविदेमध्ये अपात्र केले असले तरी नव्याने निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कंत्राटदाराची नियुक्ती करता येणे शक्य नाही. त्यामुळे अशा रितीने करोड रुपयांच्या खर्चाची उधळपट्टी जर होत असेल तर तेथे बघ्याची भूमिका घेणार नाही, असे अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

## गटविकास अधिकारी

यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने पंचायत समितीच्या सभागृहात तालुक्यातील अशा वर्कर यांना टीपीण डब्बे वाटपाच्या कार्यक्रमाला दोन ते तीन तास हजेरी लावली होती.त्यानंतर त्यांनी आपल्या कार्यालयात देखिल उपस्थिती दर्शवली होती.यावेळी तालुक्यातील विविध नागरीकांनी आपली खोळंबलेले कामे त्यांचे समोर ठेवले असता या दरम्यान गटविकास अधिकारी समृद्धी दिवाणे यांच्याकडून कामाला दूजोरा देऊण नागरीकांच्या हाती हामरेतुमरेची समृद्धी मिळाली त्यामुळे गटविकास अधिकारी समृद्धी दिवाणेंकडून असलेल्या नागरीकांच्या अपेक्षांची समृद्धी होणे अशक्यच असल्याचे पहिल्याच दिवसी दिसून आले आहे.मागच्या आठ दिवसापासून केज पंचायत समितीचे गट विकास अधिकाऱ्यांचे पद हे रिक्त आसल्याने लोकांची कामे खोळंबली होती त्यामुळे जिल्हा प्रशासनाने आंबेजोगाई येथिल गट विकास अधिकारी दिवाणे यांच्याकडे पदभार दिला आहे.आज त्यांनी आपला पदभार घेतला आहे.मात्र आज आमदार नमिता मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाला त्या आवर्जून उपस्थित राहिल्या मात्र सर्वसामान्यांना त्यांनी एक तर चार तास प्रतीक्षेत ठेवले मात्र कश्या बश्या त्या ऑफिस ला आल्या मात्र त्यांनी सर्व सामान्यांना वेठीस धरण्याचे काम पहिल्याच दिवशी केले त्यामुळे त्यांच्या वागण्याने नागरीकांच्या अपेक्षांचा भंग होणार का.? हे येणारा काळच ठरवेल. केज पंचायत समितीच्या नवीन आलेल्या गट विकास अधिकारी केज ला पदभार घेऊन आल्या मात्र सर्वसामान्यांची कामे करण्यापेक्षा त्यांनी तालुक्यातील राजकीय लोकांचे हार घेण्यात त्यांना वेळ होता. मात्र त्यांनी सर्वसामान्यांच्या फाईल वर सही करायला वेळ मिळत नव्हता हे तरी दिसून आले.

## जिल्हा परिषदेतील

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली असून ५०० विद्यार्थ्यांना चष्म्याची आवश्यकता असल्याचे समोर आले. त्यानुसार रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सहकार्याने या विद्यार्थ्यांना मोफत चष्मे देण्याचे ठरले त्याप्रमाणे आज जिल्हाधिकारी यांच्या उपस्थित जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक बडे यांना ५०० चष्म्याचे बॉक्स सुपूर्द करण्यात आले. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी महेंद्र कुमार कांबळे , तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी उपस्थित होते. दरवर्षी राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य व नेत्र तपासणी केली जाते. या अंतर्गत यावर्षीही विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आलेली आहे. जिल्ह्यांतील तपासणी ४० शाळेंमधील ५०० विद्यार्थ्यांच्या नावासह रत्ना निधी चारिटेबल ट्रस्टने चष्म्याचे पॅकेट तयार केले असून ते थेट त्याच विद्यार्थ्यांना मिळणार आहेत. जिल्हाधिकारी यांनी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत झालेली तपासणी आणि रत्ना निधी चारिटेबल ट्रस्ट कडून त्यानंतर मिळालेले चष्मे विद्यार्थ्यांनी नियमितपणे वापरण्याचे आवाहन केले आणि रत्ना निधी चारिटेबल ट्रस्टचे आभारही मानले.

## शिक्षण क्षेत्रात संस्कृती

डॉ. दत्ता नलवडे यांचे कार्य कौतुकास्पद आहे. असे उद्गार भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पालकांना मार्गदर्शन करताना काढले. संस्कृती विद्यालय व बालविकास सामाजिक प्रतिष्ठान व स्वामी विवेकानंद ग्रा. बहु, सेवाभावी संस्था संचलित संस्कृती विद्यालय व विवेकवर्धिनी गुरुकुल वार्षिक पालक मेळावा व स्नेह संम्मेलन कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री. सुर्यकांत कुलकर्णी साहेब (स्वप्नभुमी संस्था परभणी) शिक्षण विस्तार अधिकारी गंगाखेडकर मॅडम, भाजपा कामगार मोर्चा जिल्हा समन्वयक ओमप्रकाश गिरी, नितीन धांडे, मा. अश्विन भोंडवे संचालक सोनदरा गुरुकुल डोमरी, संतोषजी वारे, प्रा. केशव भांगे, सौ.संगीताताई आगाम सरपंच पिंपरगव्हाण, श्री. उध्दवजी घोलप सरपंच तळेगाव, श्रीमती अर्चना जानोळे, सर्व शिक्षक वृंद व संस्कृती विद्यालय व विवेकवर्धिनी बालगृह (गुरुकुल) चे विद्यार्थी, पालक मोठ्या संखेने उपस्थित होते.

पान ४ वरून

## कष्ट करा, नियतीने

नका. चांगला निर्णय घ्या शेतकर्यांच्या मुलांनी वाईट कामात सहभाग घेऊ नये शेतकरी खुप कष्ट करतो पण शेती मालाला योग्य भाव मिळत नाही. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाला पैसे कमी पडतात आपल्या मुलांना कष्ट करून पैसे कमवायला शिकवा तेंव्हाच त्याला पैशाची किंमत कळेल. अंगातली ताकत, खिशातला पैसा आणि आयुष्यातला वेळ जपून वापरा गेलेली वेळ पुन्हा येणार नाही. पैशाची बचत करा पैसे बाळगून रहा ते म्हातारपणी कामाला येतील. कोणापुढे हात पसरवण्याची गरज पडणार नाही. एक सेंकद सुध्दा वाया घालवू नका अभ्यास करा मंदिरात जा कष्ट करा कोणालाही घाबरू नका, पैशाने सगळ्यांना विकत घेऊ शकता परंतू काळ विकत घेऊ शकत नाही, काळ कोणाला सोड नाही काळाला जपा. मुलांनी आई-वडीलांची आणि सुनेने सासू-सासर्यांची सेवा करावी. निसर्गाचा समतोप राखण्यासाठी झाडे लावा झाडे जगवा असा संदेश दिला. खालच्या पातळीवरचं राजकारण करू नका वरच्या नेत्यांचे शिका गेल्या साडे चार वर्षात प्रत्येक पक्षाने सत्ता भोगली काहीच तक्रार नाही वरच्या सारखं गुण्या गोविंदाने राजकारण करा गलिच्छ राजकारण करू नका. गरीबीला शत्रू नाही प्रत्येकाला मोबाईल, मोटारसायकल आहे. कोणीच आता गरीब राहिला नाही. पुर्वी सारखी गरिबी आता राहिली नाही. जे लोक तोंडावर स्तुती करतात तेच लोक पाठीमागे टिका करतात. बिगर केमीकल खा आयुष्य वाढवा, केमीकल युक्त आहार घेतल्याने आयुष्य कमी होत आहे. पुर्वी आयुष्य १०० वर्षाचे होते आताचे आयुष्य ६५ वर्षाचे झाले आहे, व्यसन करू नका निर्व्यसनी रहा असे त्यांनी सांगितले. यावेळी परिसरातील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## आष्टी तालुक्यात लोकसभा

पैलवान आहात कोणता डाव टाकायचा ते टाका आम्ही तुमच्या सोबत आहोत.अशा भावना व्यक्त केल्या यावेळी व्यासपीठावर भाजपा युवा मोर्चा बीड जिल्हा सरचिटणीस डॉ धोंडे यावेळी उपस्थित जि.प. सदस्य रामराव खेडकर, जि.प.सदस्य रामदास बडे, हरीषजी खाडे, सरपंच कालिदास आघाव, राजु कापरे, महारूद्र खेडकर,गणेश खेडकर, उपसरपंच कैलास गर्क, इंजि.एम.एन.बडे, देविदास गर्कळ, श्रीमंत खेडकर, पांडुरंग नेहरकर, उत्तमराव व्हरकटे, दिनकरराव ढाकणे, माऊली पानसांबळ, उपस्थित होते.मार्गदर्शन करताना मा.आ.भिमराव धोंडे पुढे बोलताना म्हणाले की सरकारने पाठीमागे चे गाव चलो अभियान राबविण्याचा निर्णय घेतला परंतु मी प्रचाराच्या तोंडावर अभियान चालु करण्याचा निर्णय घेतला खा.प्रितमताई मुंडे च खासदार पदाच्या उमेदवार आहेत.त्यांचे मुंडे साहेबांपेक्षा जास्त शिक्षण झाले आहे.त्या एम.डी.आहेत.पार्लमेंट मध्ये भाषण करतात, निवडून तर येणारच आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची देशाला गरज आहे.भारत देशाने यान चंद्रावर पाठवले, प्रत्येक क्षेत्रात भारत पुढ गेला मोदी सरकारने २५०० योजना राबविल्या आहेत. सध्या सुरू असलेले जलजिवनचे निकृष्ट काम आहे. जलजिवन टेंम्परवरी योजना आहे. आष्टीला उजनीतुन पाणी व शिरुर साठी गोदावरी पात्रातुन पाणी व पाटोद्याला सुद्धा पाणी आले पाहिजे महाराष्ट्रात सर्वात कमी पाऊस आष्टी तालुक्यात पडतो मराठवाडा ग्रीड मध्ये घ्यायला पाहिजे नाहीतर ऊसतोड करावीच लागणार स्थलांतर ठरलेलेच आहे. या ५ वर्षात आष्टी मतदार संघाचा विकास झाला नाही.कुठेच धरण डॅम, नॅशनल हायवे,कुठच काय कामे नाहीत रेट वाढतच चालले आहेत. सध्या समाजाचे शोषण होत आहे.मी आमदार पैसे मिळवण्यासाठी झालोच नाही आपले ४२ हायस्कूल १५ ते २० ज्युनिअर कॉलेज आहेत.शाळेत पाई जात होतो.बाकीच्या शेतकरी कष्टकरी, सर्वसामान्य नागरीकांच्या मुलांची गैरसोय व्हायला नको म्हणून १९८२ ला संस्था काढली शिक्षणाची सोय केली मी मतदारसंघात केली आहे.खा.प्रितमताई मुंडे यांनी मोठ्या प्रमाणावर विकास केला आहे.त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा अशी विनंती केली भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस युवा नेते अजय धोंडे कार्यकर्तांना मार्गदर्शन करताना म्हणाले की आपल्याला खासदार खा.प्रितमताईच हव्या आहेत.ताईंच्या काळात सर्वात जास्त फंड आला तो आष्टी मतदार संघाला एक रुपयाची मा.आ.धोंडे साहेबांनी मतदार संघात मोठ्या प्रमाणावर विकासाची कामे केली एक रुपयाची अपेक्षा केली नाही नि स्वार्थी काम केले, खा.प्रितमताईंना लोकसभेला व धोंडे साहेबांना विधानसभेत पाठायचे आहे.मागिल निवडणूक विसरून चालणार नाही,आपल्यावर अन्याय झाला आता अन्यायाचा बदला घ्यायची कार्यकर्ता म्हणून संधी आता सोडायची नाही,काही कार्यकर्ते दोन डगरीवर हात ठेवुन असतात हे पहिल बंद करा एक नेत्याच्याच पाठिशी राहु आमचे दिवस आल्यावर आम्ही डोक्यावर घेऊ एकनिष्ठ राहाव दुर गेलेल्याना कधीच साहेबांनी नुकसान केल नाही मतदार संघात शांतता हवी असेल तर विधानसभेला धोंडे साहेबांना पाठायच आहे.यावेळी रामदास बडे,रामराव खेडकर,देवा गरळकर,हरीष खाडे,माऊली पानसंबळ आदींनी मनोगत व्यक्त केले.यावेळी माऊली ममगर,खाजाभाई शेख, जयसिंग खेडकर, शिवाजी व्हरकटे, बबनराव इंदलकर, विष्णू गायकवाड, संतोष सानप, रामनाथ शेळके, डॉ. नेहरकर, बंडु भागवत, भाऊसाहेब दराडे,उमेशराव खेडकर, बाळासाहेब वारे, भाऊसाहेब गांजले, आण्णासाहेब गर्कळ, सतीश आघाव, रामभाऊ खताळ, सतीश गर्कळ, रवी गर्कळ, बंडु कराड, भिमराव गर्कळ, कल्याण काळे,पत्रकार बांधव यांच्यासहसर्व सुपर वॉरीअर्स,शक्ती केंद्र प्रमुख, बुथ प्रमुख,गण प्रमुख,बुथ समिती, गन व गटातील ग्रामस्थ,आदि मान्यवर उपस्थित होते.

## तुलसी कॉलेजमध्ये

पडल्यावर एक पाखरू आरसा बघून हसतयं प्रेमात पडल्यावर, तुझ्या रुपाचं चांदण अशा स्वरचित कविता सादर करून कवी प्रा. डॉ. विनायक पवार यांनी विद्यार्थ्यांना खिळवून ठेवले या कवितांना विद्यार्थ्यांनी टाळ्याच्या गजरात आणि शिट्यांच्या आवाजात प्रतिसाद देऊन सदरील स्नेहसंमेलनाचा कार्यक्रमात रंगत आणली होती.सध्याचा शत्रू मोबाईल आहे, चीन किंवा पाकिस्तान नाही असे प्रा.डॉ.पवार सांगितले. घटना माझी गीता घटना माझे कुराण असे म्हणत त्यांनी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले असे जाहीर केले. याप्रसंगी संपादक संग्राम धनवे, प्रा. बापू घोक्षे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षीय भाषणामध्ये प्रा.प्रदिप रोडे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना न्याय देण्यासाठी सदैव तत्पर असल्याचे सांगितले. तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथील बीसीएस प्रथम वर्ष शिक्षण घेणारा रोहित गव्हाणे या विद्यार्थ्याला स्नेहसंमेलनामध्ये अप्रतिम ढोलकी वाजवल्याबद्दल त्याच्या कलागुणाचे कौतुक करून त्याचे पदव्युत्तर पदवी पर्यंतचे शिक्षण महाविद्यालयाच्या वतीने मोफत देण्यात येईल असे प्रा.रोडे यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डी.जी. निकाळजे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.योगिता लांडगे तसेच येथील विद्यार्थी ज्ञानेश्वर दराडे, सुरज भोकरे, नंदिनी गायकवाड यांनी केले. वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात तुलसीच्या पाखरणो घ्या उंच भरारी यागीतावर भरतनाट्यम त्यानंतर लोकनृत्य,लावणी,गितगायान,फोक डान्स,फणी डान्स,सोलो,गीत गायन विविध नृत्य प्रकार, ड्रामा,ग्रुप डान्स,फॅशन शो आदी सांस्कृतिक कलाप्रकार विद्यार्थ्यांनी सादर केले.या सांस्कृतीक कार्यक्रमात विविध कलागुणांचे सादरीकरण करून त्यांनी उपस्थितांची मने जिंकली स्नेहसंमेलन पाहण्यासाठी विद्यार्थी, विद्यार्थिनीसह पालकांनी तुफान गर्दी केली होती.सदरील स्नेहसंमेलन यशस्वी करण्याकरिता संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड आणि तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड येथील सर्व प्राध्यापक,कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## नागेशपुरी महाराजांनी

अन्नदान करून उपस्थितांची सेवा केली. विशेष म्हणजे टँकट्रमधे भरून महाप्रसादाचे वाटप करण्यातआले येथे एक भक्ताचा महापूर आल्याचे दिसले. हभप मच्छिन्द्र महाराजानी अनेकांचे शुक्रवारी अभिषेक केले त्यानंतर हभप भगवान महाराज यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन संपन्न झाले त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाने व्यसनापासून दूर राहवून जिवनात आदर्श निर्माण करावा आणि साधू हे वैराग्य मूर्ती असून ते साधुच असतात नागेशपुरी महाराज आणि वैकुंठवासी रामकृष्ण महाराज हे महान संत होते त्यांनी समाज प्रबोधन करून समाजाला एक नवी दिशा देण्याचे महान कार्य केले त्यामुळे येथे भक्तांची झालेली मांदियाळी या वरून सिद्द होते कि वै रामकृष्ण महाराज तपश्चर्या आणि त्यांची भक्तावर असलेले प्रेम ही त्याची पावती म्हणजे येथे झालेली हजारो भक्तांची उपस्थिती होय असे विचार मांडत महंत रामकृष्ण महाराज हे अध्यात्मिक प्रबोधनाचे चालते बोलते विद्यापीठ होते असे विचार मांडले मंहत भगवान महाराजांनी काल्याच्या अमृतुल्य किर्तनातुन मांडले. या सप्ताहमध्ये भक्तांनी विविध किर्तनकारांच्या विचारांना आत्मसात केले. या सप्तहात शिवरामपुरी मठ संस्थान वरपगाव येथे अनेकांनी विविध दुकाने लावली होती, त्यामुळे या परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती रामकृष्ण महाराज यांच्या जयघोषाने ही नगरी दुमदुमून गेली होती. त्या नंतर उपस्थित भक्तांनी महाप्रसादचा लाभ घेतला यावेळी पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. तसेच अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी ह.भ.प प्रकाश महाराज साठे,ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज लांब,ह.भ.प.दिलीप महाराज खानापूरकर, ह.भ.प.दीपक महाराज मेटे लव्हरी,ह.भ.प गणेश महाराज माळेगावकर,ह.भ.प.परमेश्वर महाराज सोन्नाखोटा,जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा,रमाकांत मुंडे,विडा गटाचे लोकप्रिय जि.प.सदस्य विजयकांत (भैय्या) मुंडे,विष्णू घुले,सुनील गलांडे,किसनदादा कदम, अकलूजचे प्रा.डॉ.आबासाहेब देशमुख,डॉ.टी एल देशमुख सह पंचक्रोशीतील मान्यवर व हजारोंच्या संख्येने भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यात्म हे समाजाची मोठी गरज आसून ज्याप्रमाणे राजकीय क्षेत्रातील लोकप्रतिनिधींचे भ्रष्टाचारी वागणे लोकांना पसंत नसते तसेच लोकांना अध्यात्मिक क्षेत्रातील लोकांचा लोभ मान्य नाही.प्रसिद्धीच्या झोतात येण्यासाठी चुकीच्या माध्यमांचा वापर केलेला नाही.म्हणूनच लोकांची या संस्थानाबद्दलची श्रद्धा अढळ आहे.संस्थानला अध्यात्मिक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण सदैव तत्पर असल्याचे प्रतिपादन यावेळी खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांनी केले आहे.

## जाहिर प्रगटन

मा.श्री.ओ.एन.मंत्री साहेब, २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात,
किरकोळ दि.अर्ज क्र. ३६१/२०२४
अर्चना अविनाश सुपेकर व ईतर विरूध्द निरंक

अर्जदार : १) अर्चना भ्र. अविनाश सुपेकर, रा. बोरखेड, ता.जि.बीड, २) श्रेया पि. अविनाश सुपेकर, रा. वरीलप्रमाणे, ३) राजवर्धन पि. अविनाश सुपेकर, रा. बोरखेड, ता.जि.बीड, ह.मु. शिवाजी चौक, पाटोदा, ता. पाटोदा,जि.बीड.

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत शोभा भ्र. लक्ष्मणराव सुपेकर** यांचा मृत्यू झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी **मयत शोभा भ्र. लक्ष्मणराव सुपेकर** यांचा दिनांक २६/०१/२०२४ रोजी झाला आहे. यांचा मृत्यू वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

**मयत शोभा भ्र. लक्ष्मणराव सुपेकर** यांच्या मृत्यूनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सरहून मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत **शोभा भ्र. लक्ष्मणराव सुपेकर** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०४/०३/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.**

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १०/०४/२०२४ आहे.**

मार्फत
ॲड. भालेराव टी.बी.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरीत
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

## जाहिर प्रगटन

मा.श्री.संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज ३९५/२०२४

अर्जदार - १) उषा किरण रूपदे, वय ५३ वर्षे, धंदा नौकरी, रा. हरिहर अपार्टमेंट, कोतवाल गल्ली,माळीवेस, बीड, ता.जि.बीड, २) नम्रता किरणरराव रूपदे, वय २७ वर्षे, धंदा नौकरी, रा. वरीलप्रमाणे, ३) प्रतिक्षा किरणराव रूपदे, वय २२ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे.

प्रकरण - बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्याअर्थी नामे किरण वसंतराव रूपदे हे दि. ०२/०२/२०२४ रोजी के.एस.के. मेडिकल कॉलेज, बीड येथे मयत असून अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ व ३ या मयाच्या मुली आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांना हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ५/०३/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख १६/०४/२०२४
क.लिपीक

मार्फत
ॲड. आर.यु.पंडित

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय,

## जाहिर प्रगटन

मा.श्रीमती टी.ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज १६५/२०२४
दत्तात्रय व ईतर विरूध्द निरंक

अर्जदार - १) दत्तात्रय शिवाजी घाडगे, वय ३५ वर्ष, धंदा शेती, पत्ता केतुरा, ता.जि.बीड, २) राहिबाई सिताराम जाधव, वय ३८ वर्ष, धंदा घरकाम, मानकुरवाडी, ता.जि.बीड, ३) रुक्मीन अशोक गुंजाळ, वय ४८ वर्ष, धंदा घरकाम, वानगांव, ता.जि.बीड, ४) शितल मोहन मोरे, वय ४२ वर्ष, धंदा घरकाम,शिवनेरी कॉलनी, बार्शी नाका, बीड, ता.जि.बीड.

विरूध्द निरंक

मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत गंधारीबाई शिवाजी घाडगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत गंधारीबाई शिवाजी घाडगे यांचा मृत्यू दि.१८/१०/२०१३ रोजी केतुरा, ता.जि.बीड येथे झाला असून अर्जदार क्र. १ मयताचा मुलगा असून अर्जदार क्र. २ व ४ या विवाहित मुली आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्यांचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत गंधारीबाई शिवाजी घाडगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ५/३/२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०८/०४/२४
क.लिपीक

मार्फत
ॲड. शेळके वाय.आर.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

# शिक्षकांचा दहावी, बारावी उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार

**मुंबई । वृत्तसेवा**

दहावी, बारावी परीक्षांचा निकाल यंदा वेळेवर लागणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहेत. कारण राज्यभरातील ५९ हजार अंशत: अनुदानित शिक्षकांनी थेट दहावी, बारावी उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार टाकला असल्याचे समोर आले आहेत. त्यामुळे अनेक शाळांमध्ये उत्तरपत्रिकांचे गठ्ठे तपासणीविना पडून असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे विभागीय शिक्षण मंडळात सोमवारी सायंकाळपर्यंत ५५० उत्तरपत्रिकांचे गठ्ठे परत आल्याचे पाहायला मिळत आहे. तर छत्रपती संभाजीनगर विभागात हे प्रमाण अधिक आहे. राज्यातील बारावीच्या विद्यार्थ्यांची २१ फेब्रुवारीपासून तर दहावीच्या विद्यार्थ्यांची १ मार्चपासून परीक्षांना



सुरुवात झाली आहे. असे असतानाच आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी अंशत: अनुदानित शिक्षकांनी दहावी, बारावी उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार टाकला आहे. अनेक शिक्षकांनी तपासणीसाठी पाठवलेले पेपरचे गठ्ठे परत पाठवले आहेत. त्यामुळे आता दहावी, बारावीचा निकाल वेळेवर लागणार का? अशी चिंता विद्यार्थ्यांना लागली आहे. तर, यावर आता शिक्षण विभाग कसा तोडगा काढणार हे देखील पाहणे महत्वाचे असणार आहे. दरम्यान, शिक्षकांच्या या भूमिकेवरून शिक्षण विभागाने देखील कडक पाऊल उचलण्याची तयारी केली आहे. उत्तरपत्रिकांचे गठ्ठे तपासणीविना परत आल्यावर शिक्षण मंडळाने मुख्याध्यापक, प्राचार्यांना पत्र पाठवले आहेत. ज्यात तपासणीविना उत्तरपत्रिका परत आल्यास कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. ज्या शाळा-कनिष्ठ महाविद्यालय उत्तरपत्रिका न तपासता परत पाठवणार आहेत, त्यांच्या महाविद्यालयाचा दहावी-बारावीचा निकाल राखीव ठेवण्यात येणार आहे. सोबतच मंडळ मान्यताही रद्द करण्यात येईल, असा इशारा शिक्षण मंडळाने दिला आहे. २१ फेब्रुवारीपासून राज्यातील बारावी आणि दहावीच्या परीक्षांना सुरवात झाली आहे. मात्र, याच परीक्षेत अनेक ठिकाणी कॉपी सुरु असल्याचे प्रकार समोर आले आहेत. जालना, बीड, लातूर जिल्ह्यात तर उघडपणे परीक्षा केंद्रावर बाहेरून कॉपी पुरवल्या जात असल्याचे समोर आले आहेत. विशेष म्हणजे भिंतीवर चढून जीव धोक्यात घालून तरुण कॉपी पुरवत असल्याचे व्हिडिओ देखील समोर आले आहेत. त्यामुळे शिक्षण विभागाच्या कॉपी मुक्त अभियानाला सर्रासपणे केराची टोपली दाखवली जातांना दिसत आहे.

## आधार कार्ड अपडेट न केल्याने होतेय नागरिकांची फसवणूक



मुंबई - आधार कार्ड हे आपल्या जीवनातील एक महत्त्वाचे कागदपत्र आहे. अनेक महत्त्वाच्या कामांसाठी आधार कार्डचा वापर होतो. सरकारी कार्यालयात, बँकेत आधार कार्डचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. इतकेच नाही तर इन्कम टॅक्स रिटर्न फाईल करताना, कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण करताना सुद्धा आधार कार्डची आवश्यकता असते. मात्र तुमच्या आधारकार्डमधली जुनी माहिती तुम्ही अपडेट केली नसेल तर तुमचे काम अडकू शकते. आधारकार्ड अपडेट न केल्यामुळे फसवणुकीचे प्रकारदेखील वाढू शकतात. त्यामुळे वेळोवेळी आधार कार्ड अपडेट करण्याचे आवाहन सरकारकडून केले जाते. णखऊ-ख कडून १४ मार्चपर्यंत आधारकार्ड कोणत्याही शुल्काशिवाय अपडेट करण्याची सुविधा दिली जात आहे. मात्र १४ मार्चपर्यंत आधारकार्ड अपडेट न केल्यास तुम्हाला आर्थिक फटका बसू शकतो. कोणताही आधारकार्डधारक आपले नाव, पत्ता, फोटो आणि इतर बदल णखऊ-ख वेबसाइटवरून १४ मार्चपर्यंत मोफत अपडेट करू शकतो. मात्र यानंतर आधार कार्डवरील माहिती अपडेट करायची असल्यास तुम्हाला प्रत्येक वेळी २५ रुपये द्यावे लागतील. त्यामुळे तुमच्या आधारमध्ये काही दुरुस्ती करायची असल्यास लगेच करुन घ्या अन्यथा १४ मार्चनंतर तुम्हाला आधार कार्ड अपडेट करण्यासाठी पैसे मोजावे लागतील.

## महायुतीत जागा वाटपावरुन महाभारत

मुंबई - लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीतल्या सर्वच पक्षांनी कंबर कसलीय. राज्यभरात प्रचार दौरे सुरु झाले आहेत. निवडणुकीच्या रणधुमाळीला खऱ्या अर्थाने सुरुवात झालीय. मात्र कळीचा मुद्दा ठरलाय तो जागावाटपाचा. महायुतीचं जागावाटप अजूनही ठरलेलं नाही. ४८ लोकसभा जागांवर कोण कुठून लढणार याची वाटणी अजून झालेली नाही. शिवसेनेने २२ तर राष्ट्रवादी कॉंग्रेसने १० जागांची मागणी केलीय. त्यामुळे भाजपवरही मोठा दबाव आहे. महायुतीत असे अनेक मतदारसंघ जिथे तीनही पक्षांनी आपापला दावा ठोकलाय. धाराशिवच्या जागेवर तीनही पक्षांनी दावा केलाय. तर परभणीत राष्ट्रवादी आणि भाजपमध्ये वाद सुरु आहे.

## राज्य कर्मचाऱ्यांना अनेक सवलती

राज्य शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या लाखो कर्मचाऱ्यांसाठी एक अतिशय महत्त्वाची आणि मोठी कामाची बातमी समोर येत आहे. भारतात येत्या काही दिवसात लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका रंगणार आहेत. यासाठी १२ मार्चपासून आचारसंहिता लागू होणार असे संकेत मिळत आहेत. विशेष बाब अशी की, लोकसभेच्या निवडणुका झाल्यात की लगेचच आपल्या महाराष्ट्रात विधानसभेच्या देखील निवडणुका होणार आहेत. अशा परिस्थितीत, सरकारच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी देखील शिंदे सरकारने नुकताच एक मोठा निर्णय घेतला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून जुनी पेन्शन योजनेसाठी लढा देणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी शिंदे सरकारने एक मोठा निर्णय घेत सध्याच्या राष्ट्रीय पेन्शन योजनेत अर्थातच एनपीएस योजनेत बदल केला आहे. यानुसार आता राज्यातील १७ लाखाहून अधिक राज्य कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५०% एवढे निवृत्तीवेतन दिले जाणार आहे तसेच यावर महागाई भत्ता वाढीचा लाभ मिळणार आहे.

## शेवगाव गोळीबारातील मारेकऱ्याचा गेला जीव

नगर -शेवगाव-गेवराई मार्गावरील एका हॉटेलजवळ रविवारी दुपारी गोळीबार झाला होता. या प्रकरणात शेवगाव पोलीस ठाण्यात जखमी युवकाने दिलेल्या फिर्यादीवरून पिन्या कापसे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गंभीर जखमी युवकाचा सोमवारी दुपारच्या सुमारास पुणे येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. अर्जुन संजय पवार, असे उपचारादरम्यान मृत्यू झालेल्या युवकाचे नाव असून तो मूळचा या प्रकरणात यवतमाळचा रहिवासी आहे. याबाबत राजेश गणेश राठोड त्याच्या फिर्यादीवरून शेवगाव पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दाखल करण्यात आली आहे. तसेच गणेश यानेही त्याच्याकडील पिस्टल काढून दोन राऊंड फायर केले. परंतु, ते पिन्या कापसे याला लागलेच नाहीत. त्यांनतर सर्वजण तेथून जात असताना पिन्याने एका दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिली.

# राजळे महाविद्यालयात एक दिवसीय संविधान प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**पाथर्डी । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, विद्यार्थी विकास मंडळ आणि राज्यशास्त्र विभाग, दादा पाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय आदिनाथनगर , ता.पाथर्डी , जि . अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दिनांक ५ मार्च २०२४ रोजी एकदिवसीय संविधान प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली . या कार्यशाळेत प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.डॉ.अरुण राख (राज्यशास्त्र विभाग प्रमुख, बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी तसेच सदस्य , राज्यशास्त्र व लोकप्रशासन अभ्यास मंडळ , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ , पुणे ) हे उपस्थित होते . भारतीय संविधानाच्या मूल्ये आणि तत्वज्ञान विषयी जनजागृती करणे काळाची गरज आहे . प्रत्येक भारतीय




नागरिकांना संविधानातील मूलभूत बाबी माहिती असणे गरजेचे आहे . संविधानातील स्वातंत्र्य,समानता,बंधुता आणि सामाजिक न्याय हे महत्त्वपूर्ण स्वरूपाची मूल्य आहेत .त्याचबरोबर लोकशाही गणराज्य प्रजासत्ताक आणि धर्मनिरपेक्ष हे भारतीय संविधानातील महत्त्वपूर्ण स्वरूपाची तत्वे आहेत यांचीही माहिती नागरिकांना असणं गरजेचं आहे . भारतीय संविधानातील ही मूल्ये आणि तत्वे समाज जीवनात बिजारोपण करण्यासाठी अशा प्रकारच्या संविधान प्रशिक्षण कार्यशाळा होणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन डॉ. अरुण राख यांनी केले . प्रा .डॉ .एम . एस. तांबोळी हे अध्यक्षस्थानी होते . भारतीय संविधान हे भारतातील विविधता टिकवणारा एक महत्त्वपूर्ण स्वरूपाचे साधन आहे . असे प्रतिपादन केले . सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गायत्री साठे तर आभार प्रा .डॉ . चंद्रकांत काळे यांनी मानले . प्राचार्य डॉ. आर . जे . टेमकर यांचे मार्गदर्शनाखाली प्रा . डॉ . विलास बनसोडे यांनी सदर कार्यशाळेचे नियोजन केले . या प्रसंगी विचारमंचावर श्री . संदीप काळे, डॉ . जे .टी. कानडे, डॉ. राजकुमार घुले आणि महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## राज्यात १७ हजार पोलिस भरती प्रक्रिया आजपासून सुरू

**मुंबई । वृत्तसेवा**

पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणांसाठी आनंदाची बातमी आहे. राज्यात आजपासून १७ हजार पोलिस शिपाई पदांसाठीच्या भरती प्रक्रियेस सुरुवात होणार आहे, आज मंगळवार ५ मार्च २०२४ पासून ऑनलाईन पद्धतीन अर्ज करता येणार आहे. ऑनलाईन पद्धतीन अर्ज करता येणार असून अर्ज करण्याची शेवटची मुदत ३१ मार्चपर्यंत असणार आहे. गेल्या काही दिवसापासून पोलिस भरतीची मागणी राज्यभरातून सुरू आहे. दरम्यान, आता राज्य सरकारने पोलिस भरतीबाबत प्रक्रिया सुरू केली आहे. मागील काही वर्षापासून राज्यात मोठी पोलिस भरती झालेली नाही. आता १७ हजार पदांसाठी अर्ज मागवण्यात आले आहेत.

पोलिस शिपाई, पोलिस शिपाई चालक, कारागृह कॉन्स्टेबल या पदांसाठी भरती प्रकिया होणार आहे. या पदांसाठी आजपासून अर्ज करु शकता, अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ मार्च आहे. पोलिस भरतीच्या अर्जासाठी खुल्या प्रवर्गासाठी ४५० रुपये शुल्क आहेत , तर राखीव प्रवर्गातील उमेदवारांना ३५० रुपये शुल्क भरावे लागणार आहेत. अर्ज करण्यासाठी उमेदवाराने मान्यताप्राप्त मंडळातून दहावी किंवा बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

## पुस्तक पाहून देता येणार १०वी, १२वीची परीक्षा

**मुंबई । वृत्तसेवा**

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. परीक्षेचा अभ्यास न झालेले काहीजण बोर्डाच्या परीक्षेत कॉपी करण्याचा प्रयत्न करतात. अशावेळी कुठेतरी लिहून किंवा थेट पुस्तकाची पाने आणून, विविध प्रकारे कॉपी केली जाते. पण परीक्षा देताना पुस्तक खुले ठेवून उत्तरे लिहिता आली तर? हो. हे शक्य होऊ शकते. कारण महाराष्ट्र बोर्डाने यासंदर्भातील संकेत दिले आहेत. काय आहे हे प्रकरण? याबद्दल सविस्तर जाणून घेऊया. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांनी खुले पुस्तक परीक्षेसंदर्भात सूचक विधान केले आहे. सीबीएसई परीक्षेच्या धर्तीवर महाराष्ट्र बोर्डामध्ये खुले पुस्तक परिक्षेसंदर्भात पायलट प्रोजेक्ट केला जाईल, अशा आशयाचे विधान त्यांनी केले. यामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. विद्यार्थ्यांमधील विश्लेषणात्मक कौशल्ये वाढवणे आणि घोकंपट्टीपासून त्यांचा बाचव करणे, असे या पॅटर्नचे फायदे आहेत. यावर चर्चा झाली. असे असले तरी अद्याप यासंदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आला नसल्याची माहिती बोर्डाच्या अधिकाऱ्याने दिली. बोर्ड आता विद्यार्थ्यांसाठी ओपन बुक परीक्षा पॅटर्न लागू करु शकते, अशी माहिती यापूर्वी २९ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्र राज्य शिक्षण बोर्डाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली होती. यानंतर चर्चेला सुरुवात झाली. दरम्यान ओपन बुक एक्झाम पॅटर्न विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर आहे का? याची खात्री केली जाणार आहे. संपूर्ण चाचणी आणि मूल्यमापन झाल्यानंतरच याबाबत निर्णय घेतला जाईल असे सांगण्यात आले. सध्या या विषयावर कोणताही ठोस निर्णय झालेला नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. आम्ही इयत्ता ९ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी खुल्या पुस्तक परीक्षा घेण्याच्या (जइए) विचारात आहोत.

# लोकसभेसाठी कॉंग्रेसचा सर्वाधिक जागांवर दावा



**मुंबई । वृत्तसेवा**

आगामी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता कधीही लागू शकते आणि त्यामुळेच सर्वच पक्ष जोमाने कामाला लागले आहेत. अशात महाविकास आघाडीतील जागावाटपाबाबत अजूनही अंतिम निर्णय झालेला नाही. मात्र, असे असताना राज्यातील एकूण २२ लोकसभेच्या जागेवर निवडणूक लढवण्यासाठी कॉंग्रेसची तयारी झाली असून, यासाबाबत आज महत्वाची बैठक बोलावण्यात आली आहे. आजच्या बैठकीत या सर्व २२ जागांवर चर्चा होणार असून, यापैकी १८ ते २० जागा कॉंग्रेस लढवणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. महाविकास आघाडीत कॉंग्रेसच्या वाट्याला येणाऱ्या जागांचा आज आढावा घेतला जाणार आहे. या बैठकीत एकूण २२ जागांचा आढावा घेतला जाणार आहे. ज्यात १८ ते २० जागा कॉंग्रेस लढवणार असल्याची माहिती मिळत आहे. विशेष म्हणजे आजच्या बैठकीत ज्या २२ मतदारसंघाचा आढावा घेतला जाणार आहे, त्या मतदारसंघातून उमेदवार कोण असणार याची देखील चाचपणी केली जाणार आहे. महाविकास आघाडीत मोठ्या प्रमाणात जागा लढवण्याबाबत कॉंग्रेस नेत्याचं एकमत झालं आहे. आजच्या बैठकीत एकूण २२ जागांचा आढावा घेतला जाणार आहे. थोड्याच वेळात टिळक भवनमध्ये कॉंग्रेसच्या या बैठकीला सुरुवात होणार आहे. या बैठकीत कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, नसीम खान यांच्यासह सर्व जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष असतील. सोबतच त्या-त्या मतदारसंघातील काही इच्छुक उमेदवार देखील या बैठकीत असणार आहे. या बैठकीत सर्व २२ जागांचा आढावा घेतला जाईल. प्रदेश कॉंग्रेसकडून आज राज्यातील २२ लोकसभेच्या जागांचा आढावा घेतला जाणार आहे. विशेष म्हणजे ही बैठक संपल्यावर मुंबई कॉंग्रेसकडून मुंबईतील जागांचा आढावा घेतला जाणार आहे. महाविकास आघाडीत मुंबईत देखील कॉंग्रेसला जागा सुटण्याची शक्यता आहे. त्यामुळे या जागेसाठी इच्छुक कोण आहेत, त्या मतदारसंघातील पक्षातील परिस्थिती या सर्वांचा बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

# एनएनएस स्वयंसेवकांनी राबविली स्वच्छता मोहीम

**पाथर्डी । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व बाबुजी आव्हाड महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित एक दिवसीय नदी स्वच्छता व संवर्धन शिबिराचे आयोजन शहरातील हनुमान बाग नदीपात्र या ठिकाणी करण्यात आले. या शिबिरामध्ये शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सहभागी झाले. या दोन्ही तालुक्यातील महाविद्यालयातील स्वयंसेवकांना या शिबिरामध्ये सहभागी करून घेण्यात आले. नदी स्वच्छता अभियानचे स्वच्छतादूत आदिनाथ ढाकणे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करतांना आदिनाथ ढाकणे यांनी विद्यार्थ्यांना



संबोधित करतांना आपण करत असलेल्या समाजोपयोगी कार्याचा लेखाजोखा विद्यार्थ्यांसमोर मांडला. त्यांनी नदी स्वच्छता मोहीम, जलसंधारण, झाडे लावणे व संवर्धन करणे यामध्येही भरीव योगदान दिले. कोपरगाव येथील गोदावरी नदीपात्र ते मागील सलग २५० आठवडे स्वच्छ करत असून लोकांची नदी स्वच्छता ठेवण्याबद्दल मानसिकता तयार करत आहेत. मेगेसेसे पुरस्कार विजेते जगविख्यात जलतज्ञ डॉ राजेंद्र सिंग यांचा राजस्थान येथील नदी पुनरुज्जीवन योजनेचा आदर्श घेऊन ते महाराष्ट्रातील नद्या स्वच्छ व पुनरुज्जीवित करण्यासाठी पुढाकार घेत आहेत. या कामाची दाखल महाराष्ट्र शासनाने घेतली आहे. नदीला आपण आईचा दर्जा देतो परंतु कृतीमध्ये आपण तिला आईचा दर्जा देत नाही ही खंत शेवटी त्यांनी बोलून दाखवली. एनएसएसच्या माध्यमातून समाजसेवेची शपथ यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. या शिबिर प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी पी ढाकणे उपप्राचार्य डॉ. बबन चौरे, प्रा दत्तप्रसाद पालवे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे डॉ. अरुण राख, प्रा. आनंद घोंगडे, डॉ. वैशाली आहेर, डॉ प्रशांत साळवे, डॉ. भगवान सांगळे, डॉ. अशोक डोळस, डॉ. अभिमन्यू ढोरमारे, प्रा. ब्रम्हानंद दराडे, डॉ. अजयकुमार पालवे, ग्रंथपाल डॉ. किरण गुलदगड, डॉ.. अर्जुन केरकळ सहभागी झाले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या २०० सेवकांनी सहभाग नोंदविला. पाथर्डी येथील परीट नदीची यावेळी स्वच्छता करण्यात आली.

## महत्त्वकांक्षी योजना मुलींच्या सक्षमीकरणासाठी

बीड – महिला व बालविकास विभाग यांच्या दि. ३० ऑक्टोबर २०२३ च्या शासन निर्णयानुसार जिल्हयात दि. १ एप्रिल २०२३ पासून मुलींच्या जन्मानंतर तिच्या सक्षमीकरणासाठी ‘लेक लाडकी योजना’ या महत्वकांक्षी योजनेची सुरुवात झालेली आहे. या योजनेअंतर्गत पिवळया व केशरी रेणनकार्डधारक कुंटूंबात मुलींच्या जन्मानंतर टप्याटप्याने अनुदान देण्यात येऊन लाभार्थी मुलींचे वय १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर मुलीस ७५,०००/– रुपये या प्रमाणे एकूण १०१०००/– (एक लक्ष एक हजार रुपये फक्त) या रकमेचा लाभ घेण्यात यावा असेआवाहन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ– मुंडे यांनी केले आहे. ‘लेक लाडकी’ ही योजना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे महत्वकांक्षी योजना असल्याने सदर योजनेचा लाभ सर्व लाभार्थ्यांपर्यंत पोहचविणे आवश्यक असल्याने ही योजना राबविण्यासाठी बालकांचे ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी डोमिसाईल प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला आवश्यक आहे. पात्र लाभार्थ्यांनी ‘लेक लाडकी’ या योजनेचा लाभ घ्यावा. अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या आहेत.

## जात प्रमाणपत्र पडताळणी त्रुटी पुर्तता शिबिराचे आयोजन

बीड – जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने विशेष अभियान राबविण्यात येणार असून दि. ६ ते १३ मार्च या कालावधीत जिल्हा जात पडताळणी समितीच्या वतीने प्रस्तावातील त्रुटीची पुर्तता करुन घेतली जाणार आहे. या अभियानांतर्गत ६ ते १३ मार्च रोजी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड बीड कार्यालय येथे त्रुटी पुर्तता शिबिर आयोजित केले आहे. वरील कालावधीत दुपारी १२.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्जदारांना समितीकडून त्रुटी पुर्ततेबाबत ऑनलाईन प्रणालीव्दारे एसएमएस व ई–मेलव्दारे पूर्व माहिती देण्यात आली असून ज्यांचे अर्ज कार्यालयात प्रलंबित आहेत अशा अर्जदारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयात उपस्थित राहून आपल्या प्रकरणातील त्रुटी जाणून घेऊन त्रुटीची पुर्तता करुन प्रलंबित प्रस्ताव निकाली काढून घ्यावे. अनुसूचित जाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती, इत्तर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ मधील नियम १७ (२) व (३) मधील तरतुदीनुसार संबंधितांना जात वैधता प्रमाणपत्राची गरज नाही असे गृहीत धरून आपला अर्ज निकाली काढण्यात येईल व त्यानंतर आपले कोणतेही म्हणने विचारात घेतले जाणार नाही, अशा सूचना जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांनी केल्या आहेत.

## होमिओपॅथिक शिबीर

बीड – सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालय, बीड आणि प्रिडीकटिव्ह होमिओपॅथी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग होमिओपॅथिक औषध–उपचार शिबीर आयोजित करण्यात आले असून गरजू रुग्णांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. जगप्रसिद्ध होमिओपॅथिक तज्ञ कै.डॉ.प्रफुल्ल विजयकर यांच्या संकल्पनेतून आणि आधारस्तंभ माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या प्रेरणेतून २००९ पासून सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालय बीड येथे मतिमंद, गतिमंद, सेरेब्रल पल्सी, कर्णबधीरता, मूकबधिरपणा, लहान मुलांचे असाध्य आजार, रेअर सिंड्रोम्स, झटके येणे (ईपिलिप्सी) अशा विविध प्रकारच्या आजारांवर होमिओपॅथिक औषध–उपचार शिबिर आयोजित करण्यात येत आहेत. आतापर्यंत जवळपास ५००० हून अधिक रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला आहे. हे शिबिर दर तीन ते चार महिन्यांच्या अंतराने आयोजित होत आहे. होमिओपॅथिक चिकित्सा पद्धतीच्या सिद्धांतानुसार रुग्णाची सखोल माहिती घेऊन होमिओपॅथिक औषध उपचार केले जातात. सदरील शिबिर दि.१० मार्च २०२४ (वेळ: सकाळी ८.००) रोजी होणार आहे. ज्या रुग्णांना याचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी श्री. मुळी ९५०३८७५३११ (सोशल वर्कर, एस.के.एच.एम.सी.बी., बीड) यांना संपर्क करून नाव नोंदणी करावी. शिबिरात सहभाग घेण्यासाठी नोंदणी बंधनकारक आहे.

asianpaints

रूद्र कलर होम

आमच्याकडे सर्व प्रकारचे वॉटर कलर,सिमेंट कलर मिळतील.

प्रो.प्रा. वाघीरे
9146702323
8149800020

पत्ता : राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड,बीड

# बीडमध्ये बालनाट्यांची अंतिम फेरी

# कौतूकाची बाब -जिल्हाधिकारी मुधोळ



**बीड । प्रतिनिधी**

बालनाट्य स्पर्धांमूळे बाल कलाकारांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो. मोठ्या प्रमाणात रंगमंच उपलब्ध होत असल्याने रंगमंचाची जवळून ओळख होते. त्यामुळे रंगमंचावर कला सादर करत असतांना सहाजिकच भर पडत राहते. शासनाच्या सांस्कृतिक धोरणामुळे महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित बालनाट्य स्पर्धेची अंतिम फेरी बीडमध्ये होत आहे, ही बाब कौतुकाची आहे. त्यामुळे बालनाट्य स्पर्धेचा बीडच्या रसिकांनी आनंद घेवून बाल कलाकारांना प्रोत्साहन द्यावे. असे आवाहन बीड जिल्हाधिकारी दिपा मुधोळ–मुंडे यांनी उदघाटनाप्रसंगी केलं. बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित २० वी महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची अंतिम फेरी बीड केंद्रावर मंगळवार (दि.५) मार्च ते रविवार (दि.१०) मार्च या कालावधीत होत आहे. या बालनाट्य स्पर्धेच्या उद्धाटन प्रसंगी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ–मुंडे बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ–मुंडे म्हणाल्या की, नाट्य चळवळ टिकून रहावी, यासाठी महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून बालनाट्य स्पर्धा होत आहेत. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार,सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा आयोजित असून या बालनाट्ये स्पर्धेस त्यांनी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेत बालकलावंतांनी व रसिक प्रेक्षकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे. तसेच या स्पर्धेत सहभागी झालेल्या बालकलावंतांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ–मुंडे यांनी केलं. बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे मंगळवार (दि.५) मार्चपासून रविवार (दि.१०) मार्च या कालावधीत बालनाट्य सादर होणार आहेत. त्यामध्ये प्रायश्चित, जय हो फॅन्टसी, आभाळमाया, काश्मीर स्माईल, असं कसं, जोकर एक अवलिया, सेज तुका, व्ही.सी.आर, देवाला पत्र, होडी, शेपूट राहिलं,काय ते जाणावे, गण्याचा देव, मनाचा देव, बुद्धाची गोष्ट असे एकूण २४ बालनाट्यांचा समावेश असणार आहे.

# विकास कामांसाठी सदैव तुमच्यासोबत -जिल्हाप्रमुख खांडे



**बीड । प्रतिनिधी**

माझ्या २३ वर्षाच्या सार्वजनिक आयुष्यामध्ये काम करत असताना तुम्ही जी सोबत मला जनतेने दिलेली आहे, जो प्रेमाचा आशिर्वाद दिलेला आहे. तो इथून पुढच्या आयुष्यात काम करण्यासाठी नक्कीच प्रेरणा देईल. उतणार नाही मातणार नाही तुम्हाला दिलेला शब्द खाली पडू देणार नाही. विकास कामांसाठी मी कायम तुमच्या सोबत असणार आहे अशी ग्वाही शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांनी दिली. बीड शहरातील विठ्ठल नगर वार्ड क्र.१ मध्ये विविध विकास कामांच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. बीड शहरातील विठ्ठल नगर वॉर्ड क्र.१ येथे विविध विकास कामाचे उद्धाटन सोमवार दि.४ मार्च रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या प्रसंगी उपजिल्हाप्रमुख परमेश्वर नाना तळेकर, शहरप्रमुख कल्याण बाप्पु कबचट,परेश मोरे, संतोष कारगुडे सुनील अनभुले, रत्नापारखी, मोरे, झणझणे, उफाडे,अक्षय जोगदंड,अभि मोरे,सचिन कुंभार यांची प्रमुख उपस्थिती होती. विठ्ठल नगर भागात १० लक्ष रु.च्या सिमेंट कामांचा शुभारंभ जिल्हाप्रमुख खांडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलतांना श्री.खांडे म्हणाले की, बीड शहरातील विविध विकास कामे ही गतीने होण्यासाठी मी कायम तुमच्या सोबत आहे. विकास कामे होत असताना ती अधिकाधिक दर्जेदारपणे करण्यासाठी नागरिकांनी सजग राहिले पाहिजे. कामाच्या गुणवत्तेत कुठेही कसूर होता कामा नये अशी अपेक्षा जिल्हाप्रमुख खांडे यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास विठ्ठल नगर भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कष्ट करा, नियतीने पैसा कमवा -ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख



**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

शांत रहा संयम ठेवा चांगले वागा, क्रोध झाल्यावर जिवन संपते, कष्ट करा नियतीने पैसा कमवा, अनितीने पैसा कमवू नका, जोपर्यंत मन निर्मळ होत नाही तोपर्यंत काहीच नाही. भक्ती करा भक्ती नसेल तर मुक्ती मिळणार नाही असे प्रतिपादन समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांनी केले. श्री क्षेत्र संमेश्वर संस्थान लिंबारूई येथे शनिवार दि.०२ पासून शिव उपासक, बालयोगी श्री संत भगवान बाबाजी यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरीनाम सप्ताह, श्री शिवलिलामृत पारायण, श्रीमद् भागवत कथा सुरू आहे. सप्ताहाचे तीसरे पुष्प गुंफताना विनोदाचार्य ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख यांनी किर्तनासाठी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या हरीपाठातील अभंग घेतला. हरी किर्तन सांगताना ते पुढे म्हणाले की, आपल्या पेक्षा श्रेष्ठ ज्ञान आहे. ज्ञानापेक्षा श्रेष्ठ देवाचे ध्यान आहे. संपत्ती आली तर दया असली तरच टिकते, लक्ष्मी येते पण स्थिर रहात नाही. अनितीने कमवलेला पैसा जास्त दिवस टिकत नाही. बळच आलेली लक्ष्मी घरात रहात नाही. स्वतःहून आलेली लक्ष्मी टिकून रहाते. दया असली तरच लक्ष्मी घरात टिकते. पापी माणसं कितीही श्रीमंत झाली तरी त्यांच्यावर जळू नका, त्याचा शेवट चांगला होत नाही. पापाने कमावलेला पैसा कितीही येऊ द्या त्याचा शेवट वाईटच असतो. जोपर्यंत मन निर्मळ होत नाही तोपर्यंत काहीच मिळत नाही. कलयुगात खर बोलणार्याचं काहीच चालत नाही. शेतकर्यांच्या मुलांनी दंगली, मोर्चे यापासून दूर रहावे. ताकतीचा उपयोग चांगला करा, काही लोक कामापुरते वापरून घेतील तुम्हाला वाईट काम केल्यानंतर सजा होईल कोणाचे चुकीचे ऐकू

(संपादकीय पानावर)

# आष्टी तालुक्यात लोकसभा निवडणुकीसाठी जनसंपर्क अभियान



**आष्टी । प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोदी सरकारने व्यापक जनसंपर्कासाठी गाव चलो अभियान हाती घेतले आहे.मोदी सरकारच्या योजना घराघरात व केलेली विकासकामे पक्षाचे नेते कार्यकर्ते गावागावात पोहचवत आहेत.याच अनुषंगाने भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा राष्ट्रीय सचिव लोकनेत्या पंकजाताई मुंडे, खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी विधानसभा मतदारसंघाचे मा.आ.भिमरावजी धोंडे हे मागिल १ महिन्यापासून मतदारसंघात गट,गण,गावागावात गाव चलो अभियान व कार्यकर्ता बैठक घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान व खा.प्रितमताईंना पुन्हा खासदार करण्यासाठी नागरीकांना विनंती करत आहेत.दि.४ फेब्रुवारी रोजी आयोजित गाव चलो अभियान व कार्यकर्ता बैठक शिरूर तालुक्यातील तिंतरवणी येथे मा.आ.भिमरावजी धोंडे यांनी नागरीकांशी संवाद साधला व कार्यकर्त्यांना नागरीकांना मोदी सरकारचे कामे सांगून खा. प्रितमताईच आपल्या उमेदवार आहेत.त्यांनी मोठ्या प्रमाणावर विकास केला आहे. असे सांगितले यावेळी कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त करताना धोंडे साहेब तुम्ही आम्हाला खुप काही दिले मा.आमदार म्हणताना खुप वेदना होतात.गावागावात तुम्ही विकास केला आहे.खा.प्रितमताईंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहु तितक्याच ताकदीने तुम्हाला विधानभवनात पाठवण्यासाठी एकदिलाने काम करु तुम्ही नामवंत

(संपादकीय पानावर)

# तुलसी कॉलेजमध्ये संमेलनाचे जल्लोषात उद्धाटन




**बीड । प्रतिनिधी**

बाई लोकशाहीचा गळा कापला या येड्यांन, रडू येते गं सखे मला मत फुकट गेल्यानं, साऱ्या स्वप्नांचा झाला भाजी पाव नौकरी द्या ना राव, या कविताचे सादरीकरण कवी प्रा.डॉ.विनायक पवार यांनी केले. येथील तुलसी संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड आणि तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीडच्या स्नेहसंमेलनाचे उद्धाटन दि २ मार्च रोजी सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे सुप्रसिद्ध चित्रपट गीतकार–कवी प्रा. डॉ. विनायक पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी देवगिरी प्रतिष्ठान बीड संस्थापक अध्यक्ष कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. रोडे, प्रमुख पाहुणे प्रा.बापू घोक्षे, संपादक संग्राम धनवे, प्रो.डॉ. मनोहर सिरसाट,तुलसी महिला मंडळ अध्यक्ष दिपाताई रोडे, प्रा.विनोद किर्दक, इंजी. दिपंकर रोडे, आयोजक प्राचार्य डॉ.एल.एम. थोरात, उपप्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे,प्रा.विद्या अवघडे यांची उपस्थिती होती. तुला कळना बीमारी माझी रं तुझी शिकार होण्याला राजी रं, वाजतय घुंगरू काना मधी दोन प्रीतीची पाखरं राना मधी, फुलपाखरू खांद्यावरती बसतं प्रेमात

(संपादकीय पानावर)

# नागेशपुरी महाराजांनी अध्यात्माचे पावित्र्य जोपासले -ह.भ.प.महंत भगवान महाराज (शास्त्री) वरपगावकर

**केज । अशोक भोसले**

नागेशपुरी महाराज व रामकृष्ण महाराजांनी अध्यात्माचे पावित्र्य जोपासले आसल्याचे प्रतिपादन ह.भ.प.महंत भगवान महाराज (शास्त्री) वरपगावकर यांनी श्री.क्षेत्र साधू शिवरामपुरी मठ संस्थान वरपगाव येथे केले आहे. श्री.क्षेत्र साधू शिवरामपुरी मठ संस्थान वरपगाव ता केज येथील ब्र .भुत .रामकृष्ण महाराज यांच्या १८ व्या अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा महंत भगवान महाराज शास्त्री यांच्या मार्ग दर्शनाखाली २३ फेब्रुवारी ते १माच दरम्यान भव्य दिव्य हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सप्ताहामध्ये



ज्ञानेश्वरी पारायण श्री परम पुज्य ह भ प महेश महाराज टेकाळे यांनी तर दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत भागवत कथा प पु रामकृष्ण महाराज शासत्री आंळदीकर यांच्या रसाळ वाणी युक्त कथेमुळे भाविक व भक्तगण आणि विशेषःत महिला वर्गाची अलोट गर्दी झाल्यामुळे हा परिसर गजबजून गेला होता.या सप्ताहामुळे अनेक मान्यवरांची अमृततुल्य कीर्तने झाली यावेळी आपापल्या परीने अनेक भाविकांनी

(संपादकीय पानावर)

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com